 **हरि ॐ**

**श्रीरणचण्डिकानैमित्तिकप्रपत्ती**

कुठल्याही एका श्रावण सोमवारी सुर्यास्तानंतर स्नान करुन त्रिविक्रमाच्या प्रतिमेसमोर बसांव
प्रथम श्रीगुरुक्षेत्रम् मंत्र ९ वेळा म्हणावा (श्रीत्रिविक्रमाचा मंत्र)
त्यानंतर ॐ नमश्चण्डिकायै हा मंत्र १०८ वेळा म्हणावा (नरसिंहाचंच मूळ रुप अस्णारा त्रिविक्रम, तो परमात्मा देवीसिंह बनुन  जी गर्जना तो हा श्रेष्ट मंत्र)
त्यानंतर त्रिविक्रमाची प्रतिमा आपल्या डोक्यावर ठेवून परत श्रीगुरुक्षेत्रम् मंत्र ९ वेळा म्हणावा ( नरसिंहपणा म्हणजे पुरुषसिंहपणा मस्तकातून आपल्या शरीरामध्ये प्रवाहित होतो आनि तो घराचं,धर्माचं व देशाचं रक्षण करायला सिद्ध सैनिक बनतो )
त्यानंतर दहीसाखरेचा व केळ्याचा नैवेद्य त्रिविक्रमास अर्पण करावा.(दहीसाखर व केळं वेगवेगळे ठेवावे)
दहीसाखरेतील एक पळी दहीसाखर  प्रपत्ती करणाऱ्या पुरुषाने आधी प्राशन करावे. केळ्यांचा प्रसाद घरातील सर्व स्त्री–पुरुषाना वाटावा
त्यानंतर परत त्रिविक्रमासमोर बसून त्याच्याकडे बघत बघत उरलेले दहीसाखर स्वत: पिऊन टाकावे (त्रिविक्रमाकडून व्हायब्रेशनच्या रुपांत मिळालेले ओज पुरुष इथे दह्याच्या रुपांत भक्षण करुन मिळवतो)
त्यानंतर त्रिविक्रमास सुगंधी फुले अर्पण करुन लोटांगण घालावे (फुले अर्पण करणे म्हणजे उपकार स्मरणे – थ्यँक्स म्हणणे)
माय चण्डिके तू मला स्वत: जवळ घे आणि मला परमात्म्याच्या हाती सोंपव . अशी प्रार्थना करावी